## नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०२१

## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–००००८४–२०२१

## निशाणी क्र.७० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी तर्फे कथन असे की, वादीने प्रतिवादी क्र.४अ हिचे नाव जयश्री प्रकाश कुवळेकर असे नमुद केले होते व आहे. परंतु प्रतिवादी क्र.४ड च्या नि.क्र.६९ लगतच्या पुरशीस द्वारा प्रतिवादी क्र.४अ चे योग्य व अचूक नाव 'राजेश्री प्रकाश कुवळेकर' असल्याचे विदीत केलेले आहे. सबब, दाव्यातील प्रतिवादी क्र.४अ चे नावातील 'जयश्री' या नावावर काट मारुन त्याठिकाणी 'राजेश्री' असे नाव लिहीण्याची व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी ताकिदी करिता व वाटपा करिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी अद्याप पावेतो मुद्दे निश्चीती झालेली नसल्याने प्रस्तुत दावा हा अद्याप पावेतो सुनावणीस लागलेला नाही. वादी यांनी त्यांच्या अर्जात केलेली मागणी तांत्रिक स्वरुपाची आहे. प्रस्तुत मागणी मान्य केल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. याउलट प्रस्तुत दाव्याचा न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे

संपूर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्त्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. परंतु वादी यांच्या निष्काळजीपणामुळे दाव्याच्या सुनावणीस झालेला विलंब देखील नजरेआड करता येणार नाही. त्यामुळे वादी यांच्यावर कॉस्ट बसवणे न्यायोचित वाटते. वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. वादी यांचा अर्ज नि.क्र.७० जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांना रक्कम रु.२००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी १४ दिवसांच्या आत प्रस्तुत अर्जात नमुद केल्या प्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.04.02 16:40:33 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड

दिनांकः ०२/०४/२०२६